नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०५/२०२५ (रविवार)**

---

## खुनाचा गुन्हा ५ तासात उघड, १ आरोपी अटक
## नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** पोलीस ठाणे नरखेड येथे फिर्यादी नामे भाऊराव गंगाधरावजी चाफले, वय ८२ वर्ष रा. सावरगाव ता.नरखेड याचा मुलगा मृतक नामे नरेंद्र भाऊरावजी चापले वय २९ वर्ष रा. सावरगाव यास दि.०९/०५/२५ रोजीचे रात्री ०८.३० वाजता ते दि. १०/०५/२५ चे १०.०० वाजता दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी कारणाने डोक्यावर मारहाण करून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार मारले अशा फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे नरखेड येथे अप क्रमांक ३२१/२०२५ कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा आहे.

मा. श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा नागपूर ग्रामीण आणि मा.श्री.बापू रोहम, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांचे मार्गदर्शनात नरखेड पोलसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू करून श्वान पथकाला घटनास्थळावर बोलावुन घेतले. नरखेड पोलीसांनी कौशल्याने तपास करून श्वान पथकाच्या मदतीने सदर गुन्हयातील आरोपी राजेंद्र भाऊराव चाफले वय — ३१वर्षे, रा.सावरगाव ( मृतकाचा भाऊ ) यास ताब्यात घेतले. आरोपीची विचारपुस केली असता नमुद मृतक हा आरोपीचा लहान भाऊ असुन घरगुती वादावरून आरोपीने शेतात वापरण्याच्या लोखंडी फावडयाने मृतक झोपेत असताना त्याचे डोक्यावर मारुन त्यास जिवानिशी ठार केल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली. नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली असुन दिनांक १३/०५/२०२५ रोजी पर्यंत मा. न्यायालयाने आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड मजुंर केला आहे.

## अवैधरीत्या गांजा (मादक पदार्थ) बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद  कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक १०/०५/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त माहितीदारानी विश्वसनीय खबर दिली की, मौजा शिवनगर कांद्री येथे जितेन्द्र वर्मा नावाचा इसम हा आपले राहते घरा मध्ये अंमली पदार्थाची विक्री करीत आहे अश्या माहिती वरून  पोलीसांनी शिवनगर कांद्री कन्हान येथे  आरोपीचे राहते घरी धाड टाकली असता सदर आरोपी नामे जितेन्द्र प्यारेलाल वर्मा, वय ५५ वर्षे ,रा.शिवनगर कांद्री कन्हान याचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता बैठक रूम मध्ये एका पिशवी मध्ये हिरव्या व तपकीरी रंगाचे वनस्पती (अंमली पदार्थ) मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष  ३३२ ग्राम गांजा (अंमली पदार्थ) असा एकुण किंमती .३३२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीविरूद्ध एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद केला आहे.

## सावनेर  येथे छत्रपती शिवाजी महाराज,महाराजस्व समाधान शिबीरात करण्यात आली सायबर गुन्हे, वाहतुक नियम, महीला तक्रार निवारण तसेच विविध पोलीस/आपत्कालीन हेल्पलाईन बाबत जनजागृती

आज दिनांक ११/०५/२०२५  रोजी  मा. आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांचे जनसंपर्क कार्यालय, पामकोर्ट लॉन, नागपूर रोड, सावनेर येथे महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज,महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते .

**या शिबिरा ला मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळें, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा , मा. डॉ. आशिषराव देशमुख, आमदार, सावनेर—कळमेश्वर विधानसभा, यांच्या सह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच विविध शासकिय कार्यालयामार्फतीने स्टॉल लावुन शासकीय योजनांबाबत तसेच जन समान्यांसाठी उपयुक्त महत्त्वाची शासकीय माहीती देण्यात आली.** सदर कार्यक्रमात मा श्री रमेश धुमाळ , प्रभारी पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा आणि श्री अनिल मस्के सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रमीण जिल्हा  पोलीस

दलाच्या वतीने **१. सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण २.भरोसा सेल, नागपुर ग्रामीण आणि ३. जिल्हा वाहतुक शाखा, नागपुर ग्रामीण यांनी शिबीरात आलेल्या जनतेला माहीती देवुन जनजागृती केली.** सायबर पोलीस स्टेशन,नागपुर ग्रामीण यांनी सायबर गुन्हयाबाबत जगजागृती करून, हेल्प लाईन क्रमांक १९३०, बेवसाईट cybercrime.gov.in बाबत माहीती तसेच सायबर गुन्हयांबाबत जनजागृती पत्रिका वाटुन महीती दिली . भरोसा सेल, नागपुर ग्रामीण यांनी महीलांच्या सुरक्षेकरीता हेल्पलाईन क्र १८१/१०९१,चाईल्ड लाईन क्र १०९८, पोलीस हेल्प लाईन क्र ११२, जेष्ठ नागरिक सुरक्षा हेल्प लाईन क्र १४५६७ याबाबत माहीती, भरोसा सेल चे कामकाज, पती पत्नीचे समुपदेशन करून तक्रार निवारण करणे बाबत, महीला व मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने नागपुर ग्रामीण जिल्हयात तैनातीस असलेले दामीनी पथक बाबत महीती, हेल्पलाईन बाबत जनजागृती पत्रिका वाटप करून जनजागृती केली. जिल्हा वाहतुक शाखा, नागपुर ग्रामीण यांनी वाहतुकीचे नियम, रस्ता सुरक्षा नियम, चांगला समिरीटन कायदा, वाहतुकीबाबत जनजागृती तसेच वाहतुक नियमांबाबत जनजागृती पत्रिका वाटप करून जनजागृती केली.









मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने